नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - २ रे / Year - 2nd | अंक - ३३६ / Issue - 336 | वार गुरुवार दि. २४ एप्रिल २०२५ / Blow- Thursday Date 24 April 2025 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com / वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ / Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये / Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 / ई-मेल आयडी yashsiddhinews@gmail.com

# पहलगाम हल्ला; भारताने पाकिस्तानची पाणी कोंडी करत सिंधू जल करार केला रद्द, व्हिसा बंद

## जगभरातील देशांचा भारताला पाठिंबा; पाकिस्तानात असणाऱ्या भारतीयांनादेखील सूचना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


नवी दिल्ली : जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यानंतर केंद्र सरकारने कठोर पावलं उचलली आहेत. या हल्ल्यानंतर आज अतिशय मोठ्या घडामोडी घडल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दिल्लीतील निवासस्थानी सीसीएस म्हणजेच कॅबिनेट सुरक्षा समितीची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीला संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, अर्थमंत्री निर्मला सीतारामन आणि परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर उपस्थित उपस्थित होते. ही बैठक जवळपास ३ तास सुरु होती. या बैठकीनंतर परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्यांनी पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत महत्त्वाची माहिती देण्यात आली. या हल्ल्यामागे पाकिस्तानचा हात असल्याचं स्पष्ट झालं आहे. त्यामुळे सीसीएसच्या बैठकीत पाकिस्तान विरोधात कठोर पावलं उचलण्यात आल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाकडून देण्यात आली आहे.

भारताने आता पाकिस्तानी नागरिकांना भारतात येण्यासाठी व्हिसा कायमचा बंद केला आहे. तसेच जे पाकिस्तानी नागरिक सध्या भारतात आहेत त्यांनादेखील पुढच्या ४८ तासांत देश सोडून जाण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच भारताने अटारी-वाघा बॉर्डर बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. अटारी-वाघा बॉर्डर १ मे पर्यंत बंद राहणार असल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाने दिली आहे.

केंद्र सरकारने सिंधू जल करार देखील रद्द करण्याचा निर्णय घेतल्याची देखील मोठी बातमी समोर येत आहे. भारतातील पाकिस्तानी दुतावास बंद करण्यात आला आहे. तसेच पाकिस्तानच्या हायकमिशनच्या ५ अधिकाऱ्यांना देखील हटवण्यात आलं आहे. पाकिस्तानच्या राजकीय अधिकाऱ्यांनी एका आठवड्यात भारत सोडावा, असा देखील आदेश देण्यात आला आहे.

केंद्र सरकारने पाकिस्तानी नागरिकांना भारतात येण्यास बंदी केली आहे. तसेच सध्याच्या घडीला भारतात असणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांना ४८ तासांत त्यांच्या मायदेशी परत जाण्याचा आदेश दिला आहे. पण सध्याच्या घडीला पाकिस्तानात फिरायला गेलेल्या भारतीयांचं काय? असा प्रश्न अनेकांना पडला असेल. तर भारत सरकारने पाकिस्तानात गेलेल्या भारतीयांना १ मे पर्यंत भारतात येण्याचे आदेश दिले आहेत. पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर भारत-पाकिस्तान संबंध पुन्हा ताणले गेले आहेत. त्यामुळे भारतीय नागरिकांनी लवकरात लवकर मायदेशी परतण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

जगभरातील देशांचा भारताला पाठिंबा, परराष्ट्र मंत्रालयाची माहिती दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आज वरिष्ठ पातळीच्या



सीसीएसची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत हल्ल्याबाबत सविस्तर चर्चा झाली. सीसीएसने या हल्ल्याची गंभीर दखल घेतली आहे. हल्ल्यात जीव गमावलेल्या नागरिकांप्रती सीसीएसने संवेदना व्यक्त केल्या आहेत. जगभरातील अनेक देशांनी या घटनेवर दु:ख व्यक्त केलं आहे, अशी देखील माहिती परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्यांनी पत्रकार परिषदेत दिली.

# दहशतवाद्यांनी १ ते ७ एप्रिल दरम्यान केली होती रेकी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पहलगाम : पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर जम्मू आणि काश्मीरमध्ये मोठी कारवाई सध्या सुरू आहे. दहशतवाद्यांकडून पर्यटकांना टार्गेट करत हल्ला करण्यात आला. देशातील अनेक भागातील पर्यटकांचा या हल्ल्यात जीव गेला. धर्म विचारून दहशतवाद्यांनी लोकांना टार्गेट केले. गेल्या काही महिन्यांपासून या हल्ल्याचा कट रचला जात असल्याची हैराण करणारी माहिती पुढे येताना दिसतंय. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, काश्मीर खोऱ्यात १५०० हून अधिक लोकांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे. या लोकांना वेगवेगळ्या जिल्ह्यांमधून आणि संवेदनशील भागातून पकडण्यात आले आहे.



पहलगामच्या हल्ल्यात दोन स्थानिकांचा देखील समावेश असल्याने मोठी खळबळ उडालीये. पहलगाममध्ये झालेल्या हल्ल्याबद्दल एक अत्यंत मोठी आणि हैराण करणारी अपडेट पुढे येताना दिसतंय. नुकताच मिळालेल्या माहितीनुसार, दहशतवाद्यांनी अगोदर रेकी करून हा दहशतवादी हल्ला घडवून आणलाय. या भागात १ ते ७ एप्रिल दरम्यान हल्लेखोरांनी संपूर्ण रेकी केली होती.

घटनास्थळापासून काही अंतरावर सुरक्षा दलांना नंबर प्लेट नसलेली मोटारसायकल सापडली होती, जी कालच जप्त करण्यात आली. गुप्तचर सूत्रांकडून पहलगाम हल्ल्याबाबत मोठा खुलासा करण्यात आला आहे. हे दहशतवादी लष्कराच्या गणवेशात दाखल झाले होते. हिंदू असल्याचे स्पष्ट होताच दहशतवाद्यांनी गोळ्या घालून ठार केले. यादरम्यान त्यांनी महिला आणि लहान मुलांना टार्गेट केले नसल्याचेही स्पष्ट झाले. जम्मू-काश्मीर पोलिस, लष्कर आणि सीआरपीएफने दहशतवाद्यांचा शोध घेण्यासाठी शोध मोहीम सुरू केली आणि पहलगाम आणि आसपासच्या भागात संपूर्ण नाकेबंदी केली. सर्व महत्त्वाच्या मार्गांवर वाहनांची तपासणी केली जात आहे. हेलिकॉप्टरद्वारे दहशतवाद्यांचा शोध घेतला जात आहे. काही ठिकाणी दहशतवाद्यांसोबत चकमक झाल्याचीही माहिती मिळत आहे. सरकारकडून या हल्ल्यानंतर कडक पाऊले उचलली जात आहेत. दिल्लीमध्ये एक बैठक पार पडली आणि काही मोठे निर्णय घेण्यात आली.

# काश्मिरातील महाराष्ट्राच्या नागरिकांना परत आणण्यासाठी विशेष विमानाची व्यवस्था



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काश्मिरातील महाराष्ट्राच्या नागरिकांना परत आणण्यासाठी विशेष विमानाची व्यवस्था करण्याचे निर्देश दिल्यानंतर २४ एप्रिल २०२५ रोजी श्रीनगर येथून मुंबईसाठी विशेष विमानाची व्यवस्था झाली असून, इंडिगोचे हे विमान महाराष्ट्रातील ८३ प्रवाशांना घेऊन मुंबईत येईल.

उद्यासाठीच आणखी एका विमानाचीही व्यवस्था करण्याचा प्रयत्न होत असून, त्यासाठीच्या प्रवाशांची यादी सुद्धा तयार होते आहे. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ हे यासाठी संपूर्ण मदत करीत आहेत.

या विशेष विमानाचा खर्च राज्य शासन करणार आहे, असे एक्सच्या सीएमओ महाराष्ट्र या हॅण्डलवर नमूद करण्यात आले आहे.

# पहलगाम हल्ल्यात ३ पाकिस्तानी दहशतवादी, तपासात हैराण करणारी माहिती उघड, सुरक्षा दलांनी अनेकांना घेतले ताब्यात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दिल्ली : पहलगाम दहशतवादी हल्ल्याची घटना कळताच मोठी खळबळ उडाली. पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी पर्यटकांना टार्गेट केले. या हल्ल्यात २८ लोकांचा जीव गेला आणि अनेकजण गंभीर जखमी असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या हल्ल्यानंतर देशात संतापाचे वातावरण बघायला मिळतंय. पहलगामच्या हल्ल्याची माहिती मिळताच अमित शहा यांनी जम्मू काश्मीर गाठले. आज सकाळीच त्यांनी हल्ल्यात जखमींसोबत संवाद साधला. आज श्रीनगर ते दिल्ली अशा अनेक बैठका सकाळपासूनच सुरूआहेत.

मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी श्रीनगरमध्ये मंत्रिमंडळाची बैठक घेतली, तर पंतप्रधान मोदींनी दिल्लीमध्ये सुरक्षा बाबींवर मंत्रिमंडळाची बैठक घेतली. या हल्ल्यानंतर कडक पाऊस उचलण्याची मागणी केली जात आहे.

दहशतवादी हल्ल्यामध्ये जीव गेलेल्यांची पार्थिव आता त्यांच्या शहरात दाखल होत आहेत. यावेळी पाकिस्तान मुर्दाबादच्या घोषणा मोठ्या प्रमाणात दिल्या जात आहेत. आता पहलगाम दहशतवादी हल्ल्याबद्दल अत्यंत मोठी माहिती ही पुढे येताना दिसतंय. पहलगाम हल्ल्यात दोन स्थानिक, तीन पाकिस्तानी दहशतवादी यांचा समावेश असल्याचे तपासात उघड झाले आहे. सुरक्षा दलांनी अनेकांना चौकशीसाठी ताब्यात घेतले असल्याचीही माहिती मिळतंय. पहलगाम हल्ल्यातील दहशतवाद्यांना जिवंत ताब्यात घेण्यासाठी लष्कराकडून मोठे प्रयत्न केले जात आहेत. काही ठिकाणी फायरिंग झाल्याचीही माहिती मिळत आहे. पहलगाम हल्ल्याचा मास्टरमाइंड सैफुल्ला खालिद असल्याचे सूत्रांनी सांगितले. तो पाकव्याप्त काश्मीर (पीओके) मधून अतिरेकी कारवाया घडवत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, त्याचे लोकेशन रावळकोट असल्याचे सांगितले जाते. सैफुल्लाने महिन्याभरापूर्वीच हल्ल्याचा इशारा दिला होता. आता सैफुल्लाला ठेचून काढण्याची मागणी केली जात आहे. लष्कर अलर्ट मोडवर आहे. तिन्ही लष्कर प्रमुखांची आज दिल्लीत बैठक झाली.

## संतप्त नागरिकांनी केली पाकिस्तानविरोधात जोरदार घोषणाबाजी

## देशवासियांना न्याय देण्याची तसेच दहशतवादावर कठोर कारवाई करण्याची मागणी

# पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यात मृत पावलेल्या डोंबिवलीतील तिघांना मुख्यमंत्र्यांकडून श्रद्धांजली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे (जिमाका) : जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या तीन जणांना बुधवारी रात्री डोंबिवलीत हजारो शोकाकुल नागरिकांनी भगशाला मैदानात एकत्रित येत अश्रूंच्या साक्षीने अखेरचा निरोप दिला.

अतिरेक्यांच्या या पूर्वनियोजित आणि घृणास्पद हत्याकांडामुळे संपूर्ण शहरात शोककळा पसरली आहे. मात्र जनतेत दहशतवादाविरुद्ध तीव्र असंतोष आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात डोंबिवली शहरातील मृत पावलेल्या हेमंत जोशी, संजय लेले आणि अतुल मोने यांच्या पार्थिवाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अंत्यदर्शन घेतले व त्यांच्या कुटुंबियांचे सांत्वन केले.

यावेळी खासदार श्रीकांत शिंदे, माजी खासदार जगन्नाथ पाटील,आमदार सुलभा गायकवाड, माजी मंत्री रवींद्र चव्हाण, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, पोलीस सहआयुक्त डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सर्वांनी घटनास्थळी भेट देऊन पीडितांच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. नागरिकांनी एकापाठोपाठ एक येत आपल्या शोकसंवेदना व्यक्त केल्याने वातावरणात कमालीची शांतता आणि दु:ख पसरले होते.




मुख्यमंत्र्यांच्या भेटीदरम्यान संतप्त नागरिकांनी पाकिस्तानविरोधात जोरदार घोषणाबाजी केली आणि सर्व पाकिस्तानी उत्पादनांवर पूर्णपणे बंदी घालण्याची मागणी केली. अनेकजण भावुक होऊन फडणवीस यांना म्हणाले, फक्त तुम्हीच आम्हाला न्याय देऊ शकता.

रात्री ९:०० च्या सुमारास फुलांनी सजलेल्या वाहनांमधून या तिघांचे पार्थिव अंत्यसंस्कारासाठी नेण्यात आले. यापूर्वी हजारो शोकाकुल नागरिकांच्या उपस्थितीत मोठी अंत्ययात्रा काढण्यात आली. भावपूर्ण श्रद्धांजली असे मोठे बॅनर वाहनावर लावण्यात आले होते, ज्यावर मृतांची नावे आणि छायाचित्रे होती.

ही अंत्ययात्रा डोंबिवलीतील डोमिनोज पिझ्झा, एम. जी. रोड, डोंबिवली स्टेशन (पश्चिम), कोपर रोड, कोपर ब्रिज, टंडन रोड, आर. पी. रोड या प्रमुख मार्गांवरून गेली आणि शेवटी शिव मंदिर रोडवरील स्मशानभूमीत या तिघांवर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. हजारो नागरिक यावेळी आपल्या भावनांना आवरू शकले नाहीत.

अंत्यसंस्कारापूर्वी भगशाला मैदानात स्मशान शांतता पसरली होती, कारण शोकाकुल नागरिक शांतपणे शवपेट्यांजवळून जात होते. अनेकजण स्तब्ध उभे होते, तर काहींच्या डोळ्यातून अश्रू वाहत होते. या घटनेमुळे समुदायाला बसलेला मोठा मानसिक आघात वातावरणात स्पष्टपणे जाणवत होता.

यापूर्वी, जेव्हा पार्थिव विमानतळावर पोहोचले, तेव्हा अनेक वरिष्ठ नेते आणि मंत्र्यांनी राज्याच्या वतीने पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.

दरम्यान, ठाणे जिल्हा प्रशासनाने रात्री उशिरा जारी केलेल्या निवेदनात सांगितले की, जिल्ह्यातील १५६ पर्यटक अजूनही जम्मू आणि काश्मीरमध्ये अडकले आहेत. विशेष विमाने आणि गाड्यांच्या माध्यमातून त्यांची घरवापसीची व्यवस्था केली जात आहे आणि ती उद्यापासून सुरू होण्याची शक्यता आहे.

या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर डोंबिवलीकरांनी समस्त देशवासियांना न्याय देण्याची तसेच दहशतवादावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

## संपादकीय....

### पाकिस्तानवर कारवाई

जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यानंतर केंद्र सरकारने कठोर पावलं उचलली आहेत. या हल्ल्यानंतर आज अतिशय मोठ्या घडामोडी घडल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दिल्लीतील निवासस्थानी सीसीएस म्हणजेच कॅबिनेट सुरक्षा समितीची महत्त्वाची बैठक पार पडली. ही बैठक जवळपास ३ तास सुरु होती. या बैठकीनंतर परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्यांनी पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत महत्त्वाची माहिती देण्यात आली. या हल्ल्यामागे पाकिस्तानचा हात असल्याचं स्पष्ट झालं आहे. त्यामुळे सीसीएसच्या बैठकीत पाकिस्तान विरोधात कठोर पावलं उचलण्यात आल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाकडून देण्यात आली आहे. भारताने आता पाकिस्तानी नागरिकांना भारतात येण्यासाठी व्हिसा कायमचा बंद केला आहे. तसेच जे पाकिस्तानी नागरिक सध्या भारतात आहेत त्यांनादेखील पुढच्या ४८ तासांत देश सोडून जाण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच भारताने अटारी-वाघा बॉर्डर बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. अटारी-वाघा बॉर्डर १ मे पर्यंत बंद राहणार असल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाने दिली आहे. केंद्र सरकारने सिंधू जल करार देखील रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. भारतातील पाकिस्तानी दुतावास बंद करण्यात आला आहे. तसेच पाकिस्तानच्या हायकमिशनच्या ५ अधिकाऱ्यांना देखील हटवण्यात आलं आहे. पाकिस्तानच्या राजकीय अधिकाऱ्यांनी एका आठवड्यात भारत सोडावा, असा देखील आदेश देण्यात आला आहे. केंद्र सरकारने पाकिस्तानी नागरिकांना भारतात येण्यास बंदी केली आहे.

# सांगली जिल्ह्याची जलक्रांतीतून समृध्दीकडे वाटचाल

केंद्र व राज्य शासनाकडून विविध उपसा सिंचन योजना, जलयुक्त शिवार अभियान, शेततळी आदि विविध कामांसाठी भरघोस निधी मिळाल्याने सांगली जिल्हा दुष्काळमुक्तीकडे वाटचाल करीत आहे. शेतीसाठी पाणी मिळू लागल्याने दरडोई उत्पादनात वाढ होऊन जिल्ह्याची वाटचाल समृध्दीकडे होत आहे. या पार्श्वभूमिवर जल व्यवस्थापन कृती पंधरवड्याचे औचित्य साधून जिल्ह्यातील उपसा सिंचन प्रकल्पांची माहिती देणारा लेख

जिल्ह्यात टेंभू, ताकारी, म्हैसाळ, आरफळ कालवा, कृष्णा कालवा मध्यम प्रकल्प आदिंच्या माध्यमातून जास्तीत जास्त शेती सिंचनाखाली आणून जिल्ह्याच्या विकासाला चालना देण्याचे शासनाचे प्रयत्न सुरू आहेत. हे सिंचन प्रकल्प शेतकऱ्यांना जीवनदायिनी ठरत असून या माध्यमातून दरडोई उत्पन्नात वाढ होऊन शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारत आहे. त्यामुळे साहजिकच त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठीही मदत होत आहे.

**टेंभू उपसा सिंचन प्रकल्प**

टेंभू गावाजवळील बराज वरून मूळ टेंभू उपसा सिंचन योजनेतून विविध टप्प्यांव्दारे २२ अ.घ.फू. पाणी उचलून सातारा, सोलापूर व सांगली या जिल्ह्यातील ७ तालुक्यामधील एकूण ८० हजार ४७२ हेक्टर क्षेत्रास सिंचन लाभ देणे प्रस्तावित होते. जून २०२४ अखेर ८० हजार ४७२ हेक्टर इतकी सिंचन निर्मिती ( १०० टक्के) झालेली आहे.

टेंभू विस्तारीत उपसा सिंचन प्रकल्पाकरिता ४१ हजार ३ हेक्टर सिंचन क्षेत्र व ८.०० अ.घ.फु. वाढीव पाणी वापर नियोजित गृहीत धरून एकूण १ लाख २१ हजार ४७५ हेक्टर सिंचन क्षेत्रास लाभ देणे प्रस्तावित होते. त्यानुसार टेंभू उपसा सिंचन विस्तारीत प्रकल्पास ७३७०.०३ कोटी इतक्या रक्कमेच्या तृतीय सुधारित प्रशासकीय अहवालास शासनाने दिनांक ५ जानेवारी २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे.

**कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्प**

कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्पांतर्गत ताकारी व म्हैसाळ अशा दोन स्वतंत्र उपसा सिंचन योजना आहेत. ताकारी उपसा सिंचन योजनेचा उद्भव कृष्णा नदीवर ताकारी गावाजवळ असून या योजनेव्दारे एकूण ४ टप्प्यामध्ये ९.३४ अ.घ.फू. पाणी उचलून त्याव्दारे सांगली जिल्ह्यातील खानापूर, तासगाव, मिरज, पलूस, कडेगाव व वाळवा या तालुक्यातील २७ हजार ४३० हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ देण्याचे नियोजित आहे.

मूळ म्हैसाळ उपसा सिंचन योजनेचा उद्भव कृष्णा नदीवर म्हैसाळ गावाजवळ असून या योजनेव्दारे एकूण ६ टप्प्यांमध्ये १७.४४ अ.घ.फू. पाणी उचलून त्याव्दारे सांगली जिल्ह्यातील मिरज, कवठेमहांकाळ, तासगाव, जत व सोलापूर जिल्ह्यातील सांगोला व मंगळवेढा या तालुक्यातील ८१ हजार ६९७ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ देण्याचे प्रस्तावित आहे.

म्हैसाळ टप्प क्र. ३ (बेडग) मधून नवीन स्वतंत्र म्हैसाळ विस्तारीत - जत उपसा सिंचन योजना प्रस्तावित आहे. म्हैसाळ विस्तारीत - जत उपसा सिंचन प्रकल्पाकरिता २६ हजार ५०० हेक्टर सिंचन क्षेत्र व ६.०० अ.घ.फू. वाढीव पाणी वापर नियोजित गृहीत धरून एकूण १ लाख ३५ हजार ६२७ हेक्टर सिंचन क्षेत्रास लाभ देणे प्रस्तावित आहे.

कृष्णा कोयना उपसा सिंचन योजना प्रकल्पास १ लाख ३५ हजार ६२७ हेक्टर सिंचन क्षेत्र व ३२.७८ अ.घ.फू. पाणी वापर गृहीत धरून ८२७२.३६ कोटी इतक्या रक्कमेस शासन निर्णय दि. २९ डिसेंबर २०२२ अन्वये पाचवी सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे.

**आरफळ कालवा**

कण्हेर धरणापासून निघणारा डावा कालवा कृष्णा नदीस जेथे छेदतो तेथून पुढे त्या कालव्यास आरफळ कालवा असे संबोधतात. आरफळ कालवा (सांगली जिल्ह्याकरिता) कण्हेर व तारळी या प्रकल्पातून ३.८३ टीएमसी पाणी वापर प्रस्तावित आहे.

**कृष्णा कालवा मध्यम प्रकल्प**

सातारा जिल्ह्यात कृष्णा नदीवर खोडशी ता. कराड येथे १५२ वर्षांचा ब्रिटिश कालीन वळवणीचा बंधारा असून नदीच्या डाव्या तीरावरून खोडशी बंधाऱ्यापासून ८६.०० कि.मी. लांबीच्या कृष्णा कालव्याव्दारे सातारा जिल्ह्यातील कराड तालुका व सांगली जिल्ह्यातील वाळवा, पलूस व तासगांव या तालुक्यातील एकूण ५० गावे येतात. येरळा नदीवर वसगडे बंधाऱ्यात पाणी सोडण्यात येते.


प्रकल्प ० ते ५६ कि.मी. पर्यंत १८६८ साली पूर्ण करण्यात आला असून महाराष्ट्र शासन निर्णय दि. २५ जून १९५६ अन्वये कृष्णा कालव्याच्या विस्तारीकरण व सुधारणा कामास मंजुरी मिळाली त्यानुसार कृष्णा कालव्याचे विस्तारीकरण व सुधारकाम सन १९७६ साली पूर्ण करण्यात आले. यानंतर वसगडे येथील येरळा नदीवरील कोल्हापूर पद्धतीचा बंधारा कृष्णा कालव्याचा टेल टँक म्हणून उपयोगात आणण्यासाठी कृष्णा कालवा विस्तारीकरण व त्यावरील वसगडे बंधारा (जिल्हा सांगली) च्या कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता शासन निर्णय दि. १९ ऑगस्ट १९८८ अन्वये एकूण २४५.९६७ लक्ष रूपये किंमतीस मान्यता देण्यात आली.

**(संकलन - श्री. शंकरराव पवार, जिल्हा माहिती कार्यालय, सांगली)**

## महाराष्ट्रात झालेल्या विधानसभा निवडणुका कायदेशीर तरतुदीनुसारच : भारत निवडणूक आयोगाचे स्पष्टीकरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकानंतर मतदार यादी व मतदानप्रक्रियेवर करण्यात येत असलेल्या आरोपांना भारत निवडणूक आयोगाने उत्तर दिले आहे. आयोगाच्या स्पष्टीकरणानुसार, निवडणूक प्रक्रियेत कोणत्याही प्रकारची त्रुटी नसून, सर्व कायदेशीर तरतुदींनुसारच निवडणुका पार पडल्या आहेत.



आयोगाच्या माहितीनुसार, महाराष्ट्रात ६ कोटी ४० लाख ८७ हजार ५८८ मतदारांनी मतदान प्रक्रियेत सहभाग घेतला. सकाळी ७ ते संध्याकाळी ६ या वेळेत दर तासाला सरासरी ५८ लाख मतदारांनी मतदान केले. तथापि, शेवटच्या दोन तासांत अपेक्षित ११६ लाखांच्या तुलनेत केवळ ६५ लाख मतदारांनी मतदान केले, हे लक्षवेधी असले तरी त्यावरून कोणत्याही गैरप्रकाराचा निष्कर्ष काढता येत नाही, असे आयोगाने स्पष्ट केले.

प्रत्येक मतदान केंद्रावर उमेदवार व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत मतदान प्रक्रिया पार पडली. काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांकडून मतदानानंतर कोणतीही तक्रार अधिकृतपणे निवडणूक निर्णय अधिकारी किंवा निरीक्षकांकडे नोंदवण्यात आलेली नाही.

मतदार यादी संदर्भात आयोगाने सांगितले की, १९५० च्या लोकप्रतिनिधी अधिनियम व १९६० च्या मतदार नोंदणी नियमांनुसार तयार केली जाते. विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम दरवर्षी राबवला जातो आणि अंतिम यादी सर्व पक्षांना उपलब्ध यादी करून दिली जाते.

याशिवाय, अंतिम यादी प्रसिद्ध झाल्यानंतर केवळ ९० अपीले करण्यात आली, जी एकूण मतदार संख्येच्या तुलनेत अत्यल्प आहेत. विशेष म्हणजे काँग्रेसकडूनही कोणतीही मोठी तक्रार नोंदवलेली नाही.

मतदान प्रक्रियेत १ लाखांहून अधिक मतदान केंद्रांवर ९७,३२५ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) व सर्व पक्षांकडून १,०३,७२७ मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी (बीएलए) नेमले गेले होते. यामध्ये काँग्रेसच्या २७,०९९ बीएलएचा समावेश होता. त्यामुळे मतदार यादी संदर्भातील आरोप पूर्णपणे निराधार असून कायद्याचा अवमान करणारे असल्याचे आयोगाने स्पष्ट केले.

२४ डिसेंबर,२०२४ रोजी निवडणूक आयोगाने काँग्रेसला लेखी उत्तर दिले असून, ही माहिती आयोगाच्या संकेतस्थळावरही उपलब्ध आहे. तरीही पुन्हा पुन्हा असे आरोप करून जनतेमध्ये संभ्रम निर्माण करणे अयोग्य असल्याचे आयोगाने म्हटले आहे.

## महाराष्ट्र - जिबूती यांच्यात व्यापारासाठी नवीन दालन खुले होणार : राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल

मुंबई : जिबूती व महाराष्ट्र यांच्यात केवळ व्यापाराचे नव्हे, तर परस्पर विश्वासाचे संबंध आहेत. हा विश्वास दृढ करूया आणि एकत्रितपणे वाढ आणि समृद्ध भविष्यासाठी काम करूया, असे आवाहन करुन महाराष्ट्र - जिबूती यांच्यात व्यापारासाठी नवीन दालन खुले होईल, असा विश्वास राजशिष्टाचार आणि पणन मंत्री जयकुमार रावल यांनी व्यक्त केला.

जिबूतीचे मानद वाणिज्यदूत विशाल मेहता आणि इंडो-जिबूती चेंबर ऑफ कॉमर्सच्या प्रतिनिधींनी मंत्री रावल यांची भेट घेतली.



यावेळी इंडो-जिबूती ट्रेड अँण्ड इंडस्ट्रीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल म्हणाले, जिबुती मध्ये अनेक संधी आहेत. पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे कार्य वेगाने चालू आहे. शेती क्षेत्रात कृषी पदवीधर युवकांना रोजगाराच्या तसेच कृषी, विज्ञान, बांधकाम, यासह विविध क्षेत्रात काम करण्याची संधी या देशात आहे. मुंबईत सध्या १०० हून अधिक परदेशी दूतावास व आंतरराष्ट्रीय चेंबर कार्यरत आहेत. भारताची भक्कम आर्थिक प्रगती पाहून अनेक देश मुंबईत आपली कार्यालये सुरू करत आहेत. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने नव्या व्यापार संधींवर चर्चा करण्यासाठी संवादाचा प्रारंभ केला आहे.

महाराष्ट्राच्या आर्थिक योगदानाबाबत माहिती देताना त्यांनी सांगितले की, भारताच्या एकूण जीडीपीमध्ये सुमारे १५ टक्के महाराष्ट्राचे योगदान आहे. मागील दशकात भारतात येणाऱ्या एकूण थेट विदेशी गुंतवणुकीपैकी ३० टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात झाली आहे. महाराष्ट्र 'एक्स्पोर्ट प्रिपेअर्डनेस'मध्ये देशात अव्वल आहे. राज्यात तीन हजारहून अधिक मोठ्या औद्योगिक युनिट्स, ५० हजार पेक्षा जास्त एमएसएमई आणि २० हून अधिक औद्योगिक कॉरिडॉर आहेत.

महाराष्ट्र-जिबूती स्ट्रॅटेजिक बिझनेस कौन्सिलची स्थापना व दर सहामाही बैठक व्हावी, इंडो-जिबूती चेंबरमध्ये महाराष्ट्र ट्रेड फॅसिलिटेशन डेस्क तयार करावा, गुंतवणूक व व्यापार वृद्धीसाठी संयुक्त कार्यगटाची स्थापना करावी, क्षेत्रनिहाय बैठका, निर्यातीला प्रोत्साहन मिळावे, असेही मंत्री श्री. रावल यांनी यावेळी नमूद केले.

## रुग्णालयातील नवजात अर्भक अपहरण रोखण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करावे : डॉ. गोऱ्हे

मुंबई : रुग्णालयांतील नवजात अर्भकांचे अपहरण रोखण्यासाठी व नवजात अर्भकांच्या सुरक्षेसाठी सर्वोच्च न्यायालयाने तयार केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करण्यात यावे. जेणेकरून नवजात अर्भक अपहरण व पळवून नेण्याच्या घटनांना आळा बसेल, असे मत विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी व्यक्त केले.

विधानभवन येथे उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या. या बैठकीला छत्रपती संभाजीनगर, हिंगोली, धाराशिव, नांदेड, बीड, परभणी, वाशिम, लातूर जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाचे कार्यकारी संचालक, संबंधित अधिकारी दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते. यावेळी महिलांच्या आरोग्य, सुरक्षितता आणि अधिकारांसंदर्भातील विविध प्रश्नांवर सखोल चर्चा करण्यात आली.

यावेळी उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन रुग्णालयांमध्ये होत नसल्याबाबत चिंता व्यक्त केली. रुग्णालयांत बेफिकीरपणामुळे प्रसूतीनंतर माता मृत्यूच्या वाढत्या घटनांकडेही त्यांनी लक्ष वेधले.

उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या, ऊसतोड कामगार महिलांना सॅनिटरी नॅपकिन्सची आवश्यकता आणि त्याचे पर्यावरणपूरक पर्याय शोधण्यावर भर देण्यात यावा. डिस्पोजल व्यवस्थेचा विचार करणे तितकेच महत्त्वाचे आहे. यासंदर्भात महिला अधिकाऱ्यांची स्वतंत्र समिती स्थापण्याची सूचना त्यांनी केल्या. त्याचबरोबर, १६ ते १९ वयोगटातील मुलींना गर्भाशय कर्करोग प्रतिबंधात्मक इंजेक्शन देण्याचा निर्णय महत्त्वपूर्ण असून, यासंदर्भात जनजागृती वाढवण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

महिलांच्या आरोग्यविषयक योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावी होण्यासाठी आरोग्य तसेच महिला व बाल कल्याण विभागांमध्ये समन्वय आणि तीन टक्के निधीचा समर्पक वापर होणे आवश्यक असल्याचे उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.

### आरोग्यविषयक सर्व योजनांचा लाभ एकाच अर्जाद्वारे द्यावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

# मुख्यमंत्री सहायता निधीची संपूर्ण सेवा 'व्हॉट्सअप'वर उपलब्ध करावी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्य शासनाच्या विविध सेवा व्हॉट्सअपवर उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने मेटासोबत सामंजस्य करार केला आहे. त्यानुसार मुख्यमंत्री सहायता निधीची संपूर्ण प्रणाली व्हॉट्सपवर उपलब्ध करून देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. आरोग्यविषयक सर्व योजनांसाठी एकच पोर्टल आणि अर्ज उपलब्ध करून देण्याचे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. मुख्यमंत्री सहायता निधीबाबत सर्व सेवा व्हॉट्सपच्या माध्यमातून नागरिकांना सहज उपलब्ध होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री सहायता निधीसंदर्भात आज सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक झाली. या बैठकीस उपमुख्यमंत्री अजित पवार, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव डॉ. श्रीकर परदेशी, मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक आदीसह डॉक्टर उपस्थित होते.



मुख्यमंत्री सहायता निधीसाठी आर्थिक तरतूद वाढविण्यासाठी 'सीएसआर' (कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी) मधून निधी घ्यावा. यासाठी संस्था स्थापन करण्यासंदर्भातील प्रस्ताव सादर करण्यात यावा. ही संस्था सीएसआर निधी मिळवून तो मुख्यमंत्री सहायता निधीसाठी नागरिकांच्या सेवेसाठी उपयोगात आणेल. ही संस्था मुख्यमंत्री सहायता निधी आणि सीएसआर यामध्ये मध्यस्थ म्हणून काम करेल. मुख्यमंत्री सहायता निधीची सेवा अधिकाधिक लोकाभिमुख करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग करण्यात यावा, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, रुग्णसेवेत येत असलेल्या अडचणींवर मात करीत रुग्ण सेवेसाठी निधीचा जास्तीत जास्त उपयोग करावा. यासाठी रुग्णालयांची संलग्नता वाढवून जास्तीत जास्त रुग्णालये पॅनल करावी. मुख्यमंत्री सहायता निधी, महात्मा फुले जन आरोग्य योजना, प्रधानमंत्री आयुष्यमान भारत योजना यापैकी रुग्णाला कुठल्या योजनेचे लाभ मिळेल, यापूर्वी घेतलेला लाभ, कुठल्या आजारावर किती लाभ मिळाला याबाबत सर्व माहिती पोर्टलवर असावी. गरजूला लाभ मिळाला पाहिजे, यासाठी पारदर्शकता आणावी. तालुकानिहाय रुग्णमित्र नियुक्त करावे. निधीबाबत सुधारित पोर्टल आणि टोल फ्री क्रमांक तयार करण्यात यावा. पोर्टलवर जियो टॅगिंग उपलब्ध करून दिल्यास रुग्णांना 'लोकेशन' नुसार जवळचे रुग्णालय शोधत उपचारासाठी सहज दाखल होता येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

राज्यात ३१ मार्च २०२५ पर्यंत ७ हजार ६५८ रुग्णांना ६७ कोटी ६२ लाख ५५ हजार रुपयांची आर्थिक मदत कक्षाच्या माध्यमातून देण्यात आली असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

## पहलगाम येथील अतिरेक्यांच्या हल्ल्यात ठाणे जिल्ह्यातील डोंबिवली मधील तीन पर्यटकांचा मृत्यू; मृतांच्या नातेवाईकांना मदतीसाठी जिल्हा प्रशासन तत्पर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे (जिमाका) : जम्मू-काश्मिरमधील पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी पर्यटकांवर भ्याड हल्ला केला. दहशतवाद्यांच्या गोळीबारात २७ पर्यटकांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये महाराष्ट्रातील पर्यटकांचाही समावेश आहे.

पहलगाम इथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात डोंबिवली शहरातील नवापाडा, पांडुरंग वाडी आणि नांदिवली परिसरात राहणाऱ्या हेमंत जोशी, संजय लेले आणि अतुल मोने या तिघांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळाली आहे.

मृतांच्या नातेवाईकांना सर्व प्रकारची मदत तत्परतेने करण्यासाठी जिल्हा प्रशासन पूर्णतः कार्यरत आहे.

या संपूर्ण परिस्थितीवर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, मुख्य सचिव सुजाता सौनिक, विभागीय आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी आणि जिल्हाधिकारी अशोक शिनगारे हे जातीने लक्ष ठेवून आहेत. त्यांनी मृतांच्या नातेवाईकांना आवश्यक ती सर्व मदत करण्याबाबत संबंधित यंत्रणांना सूचित केले आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण ने नागरिकांना आवाहन केले आहे की, पहलगाम येथे आपल्या जिल्ह्यातील कोणी व्यक्ती असल्यास किंवा आपल्या ओळखीतील कोणी नातेवाईक किंवा व्यक्ती असल्यास त्याची माहिती तात्काळ ९३७२३३८८२७ / ७३०४६७३१०५ या क्रमांकांवर जिल्हा प्रशासनास कळवावी.

त्याचप्रमाणे श्रीनगरमध्ये पर्यटकांसाठी २४७ मदत कक्ष सुरू करण्यात आला असून जिल्हा मुख्यालयात जिल्हाधिकारी कार्यालयात २४ तास कार्यरत असलेला आपत्कालीन नियंत्रण कक्ष आणि मदत डेस्क स्थापित करण्यात आला आहे. या कक्षाच्या माध्यमातून पर्यटकांना कोणत्याही वेळी मदत मिळू शकेल. त्यांना काही अडचण आल्यास किंवा आपत्कालीन परिस्थितीत ते खालील क्रमांकावर संपर्क साधू शकतात:

दूरध्वनी क्रमांक:
०१९४-२४८३६५१
०१९४-२४५७५४३
व्हॉट्सप क्रमांक:
७७८०८०५१४४
७७८०९३८३९७

अशी माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### जातिवाचक शिवीगाळ करत खंडणीची मागणी; तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

सोलापूर : सोलापूर जिल्हा सत्र न्यायालय येथे कामानिमित्त आले असता जातिवाचक शिवीगाळ करून विनयभंगाची केस करतो असे सांगून दोन लाखांची खंडणी मागितल्याचे घटना सात एप्रिलला घडली.याप्रकरणी नागनाथ हरिदास काळे (वय-४९,रा.मु.




पो. कुरुल,ता.मोहोळ) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून मारुती जाधव, त्यांची पत्नी आणि राजाभाऊ गुरुप्रसाद दिंडोरे (रा. सोलापूर) या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

यात अधिक माहिती अशी की, यातील फिर्यादी व फिर्यादीचे मित्र प्रमोद अभिमान लांडे हे कामानिमित्त जिल्हा सत्र न्यायालय येथे आले होते.यावेळी संशयित आरोपींनी फिर्यादीस 'ये पारध्या नीट रहा,तू आमच्या गावात जगायला आला आहे. नीट जग करून खा' असे जातीवाचक शिवीगाळ केले. तसेच प्रमोद लांडे यांना संशयित आरोपींनी महिलाकडून तुझ्यावर विनयभंगाची केस करतो असे सांगून दोन लाख रुपयांची खंडणीची मागणी केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

# जम्मू कश्मीर येथे पर्यटनासाठी गेलेल्या नागरिकांच्या नातेवाईकांनी जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधावा - जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

## पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात मृत्यू झालेल्या किंवा जखमी असलेल्या नागरिकांमध्ये सोलापूर जिल्ह्यातील नागरिक नाहीत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**■ जम्मू कश्मीर येथे पर्यटनासाठी गेलेले सोलापूर जिल्ह्यातील ४७ नागरिक श्रीनगर येथील हॉटेलमध्ये सुरक्षित,**

**■ टुरिस्ट कंपन्यांशी जिल्हा प्रशासनाचा संपर्क, जम्मू कश्मीर येथे पर्यटनासाठी गेलेल्या नागरिकांची माहिती घेतली जात आहे**

**■ जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सोलापूर**


०२१७ २७३१०१२ **(फक्त सोलापूर जिल्ह्याकरिता)**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : जम्मू कश्मीर येथील पहलगाम येथील पर्यटकावर दहशतवाद्यांनी दिनांक २२ एप्रिल २०२५ रोजी हल्ला केला. यामध्ये मृत्यू झालेल्या किंवा जखमी असलेल्या नागरिकांमध्ये सोलापूर जिल्ह्यातील नागरिक नाहीत. सद्यस्थितीमध्ये जिल्ह्यातील ४७ नागरिक श्रीनगर येथील एका हॉटेलमध्ये सुरक्षित आहेत. जिल्ह्यातील आणखी काही नागरिक जम्मू-काश्मीरमध्ये पर्यटनासाठी गेलेले आहेत किंवा नाही याविषयीची माहिती टुरिस्ट कंपन्यांशी संपर्क करून प्रशासन घेत आहे. तरी जम्मू कश्मीर मध्ये पर्यटनासाठी गेलेल्या पर्यटकांच्या नातेवाईकांनी जिल्हा प्रशासनाची त्वरित संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे.

जम्मू कश्मीर मध्ये सोलापूर जिल्ह्यातील पर्यटनासाठी गेलेल्या नागरिकाच्या सुरक्षेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे सर्व तहसीलदार व प्रांताधिकारी यांची सकाळी बैठक घेऊन गाव निहाय पर्यटकांच्या याद्या करण्याबाबतचे निर्देश देण्यात आलेले आहेत. तसेच तालुकास्तरावरील टुरिस्ट ऑपरेटर त्यांच्या संपर्कात राहून पर्यटकांची नावे घेण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. त्याचप्रमाणे प्रशासन जिल्हास्तरावरील सर्व टुरिस्ट कंपन्यांच्या संपर्कात असून त्यांच्याकडून जिल्ह्यातील पर्यटकांचे नावे घेण्यात येत आहेत.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्यामार्फत संपर्क क्रमांक देण्यात आलेले असून जम्मू कश्मीर येथे पर्यटनासाठी गेलेल्या पर्यटकांच्या नातेवाईकांनी दिलेल्या संपर्क क्रमांकावर प्रशासनाला माहिती द्यावी. प्रशासनाच्या वतीने सर्व पर्यटकांना सहकार्य उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली. तसेच सद्यस्थितीत मिळालेल्या माहितीप्रमाणे सोलापूर जिल्ह्यातील ४७ पर्यटक श्रीनगर येथे सुरक्षित असल्याची माहिती मिळाली असून ते पर्यटक एकत्रित एका हॉटेलवर थांबलेले आहेत. पहलगाम येथील दहशतवादी हल्लयात मृत्यू पावलेल्या किंवा जखमी असलेल्या पर्यटकांमध्ये सोलापूर जिल्ह्यातील नागरिक नाहीत त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील नागरिकांनी घाबरून तसेच ज्यांचे नातेवाईक जम्मू-काश्मीर येथे पर्यटनासाठी गेलेले आहेत अशा नातेवाईकांनी तात्काळ जिल्हा प्रशासनाला संपर्क करावा व त्यांची माहिती उपलब्ध करून द्यावी असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.



पिंपळनेर तालुका माढा येथील सरपंच राहुल पेटकर हे ४७ नागरिकांसोबत श्रीनगर येथे एका हॉटेलमध्ये थांबलेले असून श्री. पेटकर यांच्याशी तसेच पोलीस पाटील यांच्याशी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी भ्रमणध्वनीद्वारे संपर्क करून त्यांच्या व सोबतच्या सर्व नागरिकांच्या सुरक्षेची माहिती घेतली तसेच त्यांना जिल्हा प्रशासनाच्या वतीने आवश्यक असलेले सर्व सहकार्य उपलब्ध करून देण्यात येईल, असे आश्वासनही देण्यात आलेले आहे.

संपर्क क्रमांक : जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, सोलापूर ०२१७ २७३१०१२ (फक्त सोलापूर जिल्ह्याकरिता)

शक्तीसागर ढोले, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर - +९१९८२२५१५६०१,

मदनसिंग परदेशी, सहाय्यक महसूल अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर - +९१९८२३०६५०९०,

अरविंद चौगुले, महसूल सहाय्यक,जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर - +९१९३५९३९७५२४

# लोकशाही दिन: नागरिकांनी विहित नमुन्यात अर्ज सादर करावेत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : जिल्हा लोकशाही दिनासाठी सोलापूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतून, गावातून नागरिक अर्ज सादर करीत असतात. परंतु अर्ज सादर करावयाची प्रक्रिया माहिती नसल्याने त्यांचे अर्जावर लोकशाही दिनाचे निकषांनुसार कार्यवाही करणे शक्य होत नाही. यासाठी सामान्य नागरिकांना जिल्हा लोकशाही दिनासाठी विहित नमुन्यात अर्ज सादर करावेत असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी

जिल्हा लोकशाही दिनासाठी अर्ज स्वीकृतीचे निकष पुढीलप्रमाणे:- जिल्हा लोकशाही दिनासाठी अर्ज विहित नमुन्यात सादर करावा, तक्रार, निवेदन वैयक्तिक स्वरूपाची असावी,लोकशाही दिनाकरीता अर्जदाराने अर्ज विहित नमुन्यात १५ दिवस आधी २ प्रतींत पाठविणे आवश्यक राहील, तालुका लोकशाही दिनानंतर १ महिन्याने जिल्हा लोकशाही दिनात अर्ज करता येईल.

लोकशाही दिनासाठी पुढील विषयावरील अर्ज स्वीकारले जाणार नाहीत: - न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपिल्स (अर्धन्यायिक प्रकरणे, अपिल केसेस),सेवाविषयक, आस्थापना विषयक बाबी,विहित नमुन्यात नसणारे व त्यासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज,अंतिम उत्तर दिलेले आहे, देण्यात येणार आहे अशा प्रकरणी पुन्हा त्याच विषयासंदर्भात केलेले अर्ज,तक्रार, निवेदन वैयक्तिक स्वरूपाची नसेल तर.

लोकशाही दिनात अर्ज सादर करण्याचा नमुना व आवश्यक कागदपत्रे पुढील प्रमाणे:-. अर्जदाराचे नाव व पुर्ण पत्ता,. दुरध्वनी, भ्रमणध्वनी क्रमांक, ई-मेल असल्यास, विषय, तालुका लोकशाही दिनात अर्ज केला होता काय? असल्यास टोकन क्रमांक, तहसिदारांकडून

**उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांचे आवाहन**

मिळालेले उत्तर तसेच दिनांक व अर्जदाराची सही आवश्यक, आहे

तसेच लोकशाही दिन जिल्हाधिकारी कार्यालयात होईल. त्यावेळी मूळ अर्जदार यांनी स्वत: उपस्थित रहावे, विहीत नमुन्यात अर्ज त्यासोबत अर्जाची आगाऊ प्रत जोडून लोकशाही दिनाच्या १५ दिवस आधी पाठविणे आवश्यक, वरील बाबींची पुर्तता केली नाही तर लोकशाही दिनात प्रत्यक्ष अर्ज सादर करता येणार नाही, प्रकरण थेट जिल्हाधिकारी कार्यालयाशी संबंधित असले तर तालुका लोकशाही दिनातील टोकन क्रमांक व त्याची प्रत आवश्यक राहणार नाही. असे निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी कळविले आहे.

# आ. नारायण आबा पाटील यांच्या प्रयत्नातून आणखी चार एस.टी. बसेस करमाळा आगारात दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : आमदार नारायण आबा पाटील यांनी नामदार प्रताप सरनाईक यांच्याकडे करमाळा आगारासाठी एकूण वीस नवीन एसटी बसेस मागितल्या होत्या. पहिल्या टप्प्यात पाच नवीन बस मिळाल्यानंतर आता दुसऱ्या टप्प्यात चार नवीन एसटी बस करमाळा आगारासाठी मिळवण्याचा मार्ग मोकळा झाला असून उद्या सकाळी या गाड्या करमाळा आगारात दाखल होतील. त्यामुळे आता करमाळा तालुक्यातील दळणवळण प्रश्न बऱ्यापैकी सुटला जाऊ शकेल उर्वरित नवीन एस टी बसेस सुद्धा येत्या काही महिन्यात करमाळा आगारासाठी उपलब्ध होतील असा आमदार नारायण आबा पाटील यांनी विश्वास व्यक्त केला आहे. करमाळा आगारासाठी नवीन चार गाड्या दिल्याने प्रवासी रुग्णवृद्ध महिला व खास करून शालेय तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी यांचा प्रवासाचा प्रश्न सुटला जाईल. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे करमाळा तालुक्यातील नागरिकांच्या व विविध शैक्षणिक संस्था तसेच व्यापारी मंडळाच्या वतीने आभार व्यक्त केले जात आहे.

# ठाणे ग्रामीण राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या पदाधिकाऱ्यानीं घेतली अजितदादांची सदिच्छा भेट




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : ठाणे ग्रामीण राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या पदाधिकाऱ्यानीं राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष व राज्यचेउ उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची भेट घेऊन विविध विषयासंदर्भात चर्चा केली.

मंत्रालय मुंबई समोरील राष्ट्रवादी भवनात सोमवारी ही भेट घेण्यात आली यावेळी ग्रामीणमधील सार्वजनिक आरोग्य, रस्ते, पाणी, व राष्ट्रवादी काँग्रेस सदस्य नोंदणीबाबत चर्चा करण्यात आली यावेळी गरजुंना मदत करण्यासाठी नेहमी पुढे येत जा व राष्ट्रवादी काँग्रेस सदस्य नोंदणी जोमाने करा घाबरू नका मी कायम तुमच्या सोबत आहे.असे अजितदादा पवार यांनी यावेळी ठाणे ग्रामीण मधील पदाधिकांऱ्याना मार्गदर्शन करताना सांगितले.तर राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टी भिवंडी तालुका अध्यक्ष दिलशाद शेख यांच्या वतीने अजितदादा पवार यांना फोटोफ्रेम भेट देण्यात आली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद हिंदुराव ठाणे जिल्हा अध्यक्ष भरत भाऊ गोंधळे, ठाणे जिल्हा महिला अध्यक्षा कल्पना तारमळे, राष्ट्रवादी युवक जिल्हा अध्यक्ष प्रतीक हिंदुराव महाराष्ट्र राज्य प्रांतीक सदस्य रविंद्र परटोले भिवंडी तालुका अध्यक्ष विजय दादा पाटील, राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टी भिवंडी तालुका अध्यक्ष दिलशाद शेख शहापूर शहर युवा कार्यकर्ते केतन वेखंडे उपस्थित होते.

# जैन मंदिर उद्ध्वस्त करणाऱ्या प्रशासनावर कायदेशीर कारवाई करा

## वंचित बहुजन आघाडी यांची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : वंचित बहुजन आघाडी सोलापूर सर्व जिल्ह्यांच्या वतीने बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने विलेपार्ले येथील जैन मंदिर चुकीच्या व बेकायदेशीर रित्या त्यांचा क्रूर पद्धतीने बुलडोझर व जेसीबीच्या साह्याने मंदिर उद्धवस्त केले आहे एवढंच नाही तर मंदिर उद्धवस्त करताना तेथील धार्मिक ग्रंथ पूजा साहित्याचे विटंबना करण्यात आली आणि मूर्ती देखील भंग करण्यात आली.

सदर प्रशासनाच्या या जुलमी चुकीच्या बेकायदेशीर वागण्यामुळे समस्त जैन धर्मीय समाज बांधव अत्यंत आक्रोशीत आहे, भारतीय संविधानात सर्व धर्मीयांना संरक्षण दिले गेले आहे

**शहर व जिल्ह्याच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन**

असे असताना विलेपार्ले येथील आरक्षित जागेवरील जागेवरील मंदिर पाडण्यात आले सदर प्रशासनाच्या विरोधात कठोर कारवाई करून संबंधित अधिकाऱ्यांना



बडतर्फ करावी आणि मंदिरपुनर स्थापित करून मंदिराची शोभा वाढवावी अशा प्रकारचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी तथा अप्पर जिल्हा दंडाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

याप्रसंगी जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे, जिल्हा महासचिव अनिरुद्ध वाघमारे, जिल्हा उपाध्यक्ष सोहेब सय्यद , बार्शी तालुका अध्यक्ष बाबासाहेब गायकवाड, दक्षिण सोलापूर तालुका अध्यक्ष सुरेश देशमुख, बाबुराव बनसोडे अण्णा, शहर चे मल्लिकार्जुन हिरेमठ, सम्यक विद्यार्थी आंदोलन राज्य प्रवक्ता रविराज पोटे, अक्कलकोट शहराध्यक्ष विशाल ठोंबरे, भारिप माजी जिल्हाध्यक्ष विजय गायकवाड आधी पदाधिकारी उपस्थित होते.

**व्हाईस चेअरमन पदासाठी सादिक काझी यांची बिनविरोध एकमताने निवड** | **पंचवार्षिक निवडणुक**

# मुरूम येथील विठ्ठलसाई कारखान्याच्या अध्यक्षपदी बसवराज पाटील यांची बिनविरोध निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा प्रतिनिधी/ज्ञानेश्वर गुरव :

उमरगा तालुक्यातील मुरूम येथील श्री विठ्ठलसाई सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमनपदी माजी मंत्री बसवराज पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली तर व्हाईस चेअरमनपदी सादिक काझी यांची निवड करण्यात आली आहे. मुरुम येथील श्री विठ्ठलसाई सहकारी साखर कारखान्याची पंचवार्षिक निवडणुक बिनविरोध पार झाली आहे. कारखान्याचे सर्व २१ संचालक बिनविरोध निवडुन आल्यानंतर चेअरमन व व्हाईस चेअरमनपदाच्या निवडीसाठी कारखाना कार्यस्थळावर मंगळवारी (दि.२२) कारखाना कार्यस्थळावर बैठक पार पडली. यावेळी अध्यासी अधिकारी म्हणुन जिल्हा उपनिबंधक पांडूरंग साठे यांनी काम पाहिले. चेअरमन पदासाठी माजी मंत्री बसवराज पाटील यांचे नांव रामकृष्णपंत खरोसेकर यांनी सुचवले त्यास केशवराव पवार यांनी अनुमोदन दिले. तसेच व्हाईस चेअरमन पदासाठी सादिक काझी यांचे नांव शरणप्पा पत्रिके यांनी सुचवले त्यास माणिकराव राठोड यांनी अनुमोदन दिले. दोन्ही पदासाठी सभेत एक एकच नांव सुचविल्याने अध्यासी अधिकारी यांनी चेअरमन पदासाठी बसवराज पाटील यांची तर व्हाईस चेअरमन पदासाठी सादिक काझी यांची बिनविरोध एकमताने निवड झाल्याचे जाहीर केले. सभेस नवनिर्वाचित संचालक बापुराव पाटील, शरण बसवराज पाटील, विठ्ठलराव पाटील, संजय बिराजदार, दिलीप पाटील, ॲड.सुभाषराव राजोळे, विठ्ठलराव बदोले, राजीव हेबळे, संगमेश्वर घाळे, शब्बीर जमादार, शिवलिंगप्पा माळी, शिवमुर्ती भांडेकर, दिलीप भालेराव, सौ.इरम्माताई स्वामी, श्रीमती मंगलताई गरड व कारखान्याचे कार्यकारी संचालक एस.आर.गवसाणे उपस्थित होते.यावेळी बोलताना कारखान्याचे नवनिर्वाचित चेअरमन पाटील म्हणाले की, कारखान्याची निवडणुक बिनविरोध झाल्याने सभासदांनी आमच्यावर खुप मोठा प्रचंड विश्वास दाखविला आहे. याबद्दल सभासदांचे आभार व्यक्त करून, अशाच सहकार्याची अपेक्षा व्यक्त करतो. यापुढे संचालक मंडळाची आणखीन जबाबदारी वाढली आहे. त्यांच्या विश्वासास पात्र राहून यापुढेही सभासदांचे हित डोळयापुढे ठेवून उपपदार्थ निर्मीतीसह कारखान्याची उत्तरोत्तर प्रगती साधली जाईल. येत्या गळीत हंगामात साडेपाच लाख मे.टन ऊस गाळपाचे उदिष्ठ असुन ऊस उत्पादक शेतकरी, सभासद, तोडणी वाहतुक यंत्रणा, कारखाना कर्मचारी व कामगार या सर्वांच्या सहकार्याने यशस्वीरित्या उदिष्ठ पुर्तता होईल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. तसेच आपल्या कारखान्याचे प्रति दिनी ३० हजार लिटर डिस्टलरी/इथेनॉल प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर असुन लवकरच प्रकल्प उभारणीच्या कामास सुरूवात होणार आहे. यासाठी प्रधानमंत्री नरेद्र मोदी, केंद्रिय सहकार मंत्री अमीत शहा , मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे फार मोठे सहाय्य आपल्याला मिळाले आहे. यावेळी कारखान्याचे नवनिर्वाचित चेअरमन, व्हाईस चेअरमन व सर्व संचालकांचा यथोचित सत्कार करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. या कार्यक्रमासाठी कारखाना कार्यक्षेत्रातील सभासद, ऊस उत्पादक शेतकरी, पदाधिकारी, कार्यकर्ते, कारखान्यातील अधिकारी, कर्मचारी, कामगार व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# पहलगाम घटना; राज्य आपत्कालीन कार्य केंद्रात दोन अधिकाऱ्यांची नियुक्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : जम्मू व काश्मीर येथील पहलगाम येथे पर्यटकांवरील झालेल्या दहशतवादी हल्लूयात महाराष्ट्रातील बाधित नागरिकांच्या मदतीसाठी राज्य आपत्कालीन कार्यकेंद्र (मंत्रालय नियंत्रण कक्ष) येथील कक्षात दोन अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन संचालक सतीशकुमार खडके यांनी दिली.

मंत्रालय नियंत्रण कक्षात राज्य आपत्कालीन कार्य केंद्राचे व्यवस्थापक विशेषकर सुर्यवंशी व कक्ष अधिकारी नितीन मसळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी अथवा त्यांच्या नातेवाईकांनी मदतीकरिता मंत्रालय नियंत्रण कक्ष येथील दूरध्वनी क्रमांक ०२२-२२०२७९९०/२२७९४२२९ व भ्रमणध्वनी क्रमांक ९३२१५८७१४३ (वॉट्सअप क्रमांक) तसेच आपत्कालीन संपर्क क्रमांक (टोल फ्री १०७०) या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन श्री.खडके यांनी केले आहे.

# हँडल लॉक केलेली दुचाकी पळविली

सोलापूर : गंजी कारखाना येथून हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी (क्रमांक एम एच १३ सी जी ५८०७ ही चोरून नेल्याची घटना सोमवारी घडली.याप्रकरणी रमेश सोमनाथ नंदर्गी (वय-५३, रा.भारतरत्न इंदिरा नगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

## थोडक्यात...

### दुचाकीला कारने ठोकरले

सोलापूर : उद्धव नगर येथे दुचाकीवरून घराकडे जाणाऱ्या इसमास भरधाव कारने धडक दिल्याची घटना सोमवारी घडली.याप्रकरणी गौरीशंकर परशुराम जमखंडीकर (वय-४३ रा.प्रल्हाद नगर, विजापूर रोड) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून कारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. यात मिळालेली माहिती अशी की, यातील फिर्यादी हे दुचाकी क्रमांक एम एच १३ सी वाय १२०६) यावरून दावत चौक येथून घराकडे जात होते. यावेळी उद्धव नगर येथे आले असता समोरून विरुद्ध दिशेने येणाऱ्या भरधाव चारचाकी कार (क्रमांक एम एच १३ सी एम ८४१८) या चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने चालवून फिर्यादीच्या दुचाकीला धडक दिली. तसेच फिर्यादीच्या डाव्या पायाच्या तळव्याचे वरचे हाड तुटून व उजव्या हाताचे कोपऱ्याचे हाड तुटून फ्रॅक्चर होऊन गंभीर जखमी होण्यास कारणीभूत झाला असल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

# पहलगाम दुर्घटनेतील महाराष्ट्रातील चार पार्थिव मुंबईकडे रवाना

## तर दोन पार्थिव दिल्ली मार्गे पुण्यास रवाना; राज्य आपत्ती व्यवस्थापन कक्षाची माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : जम्मू व काश्मीर येथील पहलगाम येथे घडलेल्या दुर्दैवी घटनेत महाराष्ट्रातील सहा पर्यटकांचा मृत्यू झाला आहे.

यातील चार जणांचे मृतदेह हवाई मार्गे मुंबईला पाठविण्यात येत असून दोन पार्थिव दिल्ली मार्गे पुणे येथे पाठविण्यात येणार असल्याची माहिती जम्मू व काश्मीर प्रशासनाकडून प्राप्त झाली आहे. दिल्ली येथे येणाऱ्या पार्थिवांसोबत असलेल्या नातेवाईकांशी दिल्लीतील राजशिष्टाचार कार्यालयातील अधिकारी सतत संपर्कात असल्याचे राज्य आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडून सांगण्यात आले आहे.

या दुर्घटनेत जखमी झालेल्या चार पर्यटकांशी संपर्क करण्यात आला असून ते सुखरूप असल्याचे प्रशासनाने सांगितले आहे. जम्मू व काश्मीरमध्ये पर्यटनासाठी गेलेल्या इतर पर्यटकांची माहिती घेतली जात आहे.

आतापर्यंत २७५ पर्यटकांशी संपर्क साधण्यात आलेला आहे. स्थानिक प्रशासनाच्या सहकार्याने त्यांची निवासव्यवस्था आणि पुढील प्रवासासाठी आवश्यक ते समन्वय केले जात असल्याचेही राज्य आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडून सांगण्यात आले आहे.

# पहलगाम येथे गेलेल्या माढा व पंढरपुरातील ४७ पेक्षा जास्त कुटुंबीयांशी झाला संपर्क : आ. अभिजीत पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : पहलगाव (जम्मू काश्मीर) येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर जम्मू आणि काश्मीरमध्ये माढा व पंढरपूर तालुक्यातील जवळपास ४७ पेक्षा जास्त कुटुंबाची संपर्क झाला असून आज सोलापूरचे पालकमंत्री ना. श्री जयकुमार जी गोरे साहेब व मी संपर्क करून काळजी घेण्याची सांगितले आहे.

लहान मुले ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना सुरक्षितपणे परत आणण्यासाठी सोलापूर जिल्हाधिकारी श्री कुमार आशीर्वाद साहेब यांना दूरध्वनीवरून संपर्क करून तात्काळ विशेष विमानाची सोय करून त्यांना परत घेऊन येण्यासाठी सकारात्मक चर्चा झाली आहे मी व सर्व नातेवाईकांना आवाहन करतो की घाबरून जाऊ नका आम्ही अडकलेल्या सर्व नागरिकांना लवकरात लवकर सुरक्षित प्रयत्न करण्याची प्रयत्न करीत आहोत.

# व्यायामशाळा विकास अनुदान मर्यादा ७ लाखांवरून १४ लाख रुपये – क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : ग्रामीण आणि शहरी भागातील व्यायामशाळा सुविधा अधिक बळकट करण्यासाठी व्यायामशाळा विकास अनुदान ७ लाखांवरून थेट १४ लाख रुपये करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती, क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली आहे. व्यायाम शाळा बांधण्यासाठी अनुदान मर्यादा २०१४ मध्ये २ लाखांवरून ७ लाख रुपये करण्यात आली होती. बांधकाम खर्चात झालेली वाढ लक्षात घेता ही मर्यादा १४ लाखांपर्यंत वाढविण्यात आली असल्याचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

# श्री विठ्ठल कारखान्यास एनसीडीसी कडून मिळालेल्या कर्जाची चौकशी करावी : संतोष भालेराव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : शासनाने श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याला ३४७ कोटी कर्ज मिळवूनही व्यापारी देणे कामगारांची देणे थकवल्या जा पत्रकार परिषद आरोप केला. चेअरमन अभिजीत पाटील यांनी त्याचा योग्य वापर केला नाही. व्यापाऱ्यांची देणे व कामगारांचे पगारही दिले नाहीत.

या पैशाची काय केले असा आरोप संतोष भालेराव यांनी केला.

संतोष भालेराव यांनी आज पत्रकार परिषद घेऊन अभिजीत पाटील यांच्या पैसे न दिल्याचा आरोप केला आहे. श्री विठ्ठल कारखान्याला आपण म** पुरवला आहे त्याची रक्कम मला अजून मिळालेली नाही. ही रक्कम मिळावी म्हणून अभिजीत पाटील यांच्याकडे पाठपुरावा केला. त्यांनी शासनाकडून आल्यावर रक्कम देतो असे आश्वासन दिले होते. ३४७ कोटी रुपये आले आहे यातील व्यापारी देण्यासाठी ५९ कोटी रुपये व कामगारांचे पगार देण्यासाठी ४१ कोटी रूपांचा समावेश आहे. पाटील यांनी व्यापारी व कामगारांना दिले नाहीत.



गेल्या आठ महिन्यापासून रक्कम मिळाले म्हणून आपण पाठ पुरावा करत आहे. साखर आयुक्तांनी चेअरमन पाटील यांना भालेराव यांची रक्कम द्यावी अशा सूचना दिल्या आहेत तरी-ही कारखान्याकडून रक्कम मिळत नाही. आता आपण ईडीकडे तक्रार करणार असल्याचे भालेराव यांनी सांगितले.

शासनाकडून साखर कारखाने रक्कम घेतात पण व्यापारीचे व कामगारांचे पगार देत नाही म्हणून साखर आयुक्तांनी बैठक घेऊन साखर कारखान्यात व्यापारी व कामगारांची देणे पगार देण्याच्या सूचना केल्या आहेत असे भालेराव. यांनी सांगितले

# मुख्यमंत्री वयोश्री योजना : शिबिराचे आयोजन; २४ ते ३० एप्रिल २०२५ या कालावधीत होणार शिबीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : राज्यातील ६५ वर्ष वय व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी आणि त्यांना वयोमानपरत्वे येणाऱ्या अपंगत्व, अशक्तपणा यावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक सहाय्य साधने उपकरणे खरेदी करणेकरिता तसेच मनःस्वास्थ केंद्र, योगोपचार केंद्र इ. द्वारे त्यांचे मानसिक तथा कौटुंबिक स्वास्थ अबाधित ठेवण्यासाठी राज्यात मुख्यमंत्री वयोश्री योजना राबविण्यात येते.

सदर योजनेतील सोलापूर जिल्हयातील १५ हजार ७१६ लाभार्थ्यांचे आधार अपडेट नसल्यामुळे लाभार्थ्यांच्या बँक खात्यात लाभ वितरित झालेला नाही. त्यामुळे दिनांक २४ ते ३० एप्रिल २०२५ या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवन सात रस्ता, सोलापूर येथे शिबिराचे आयोजन करण्यात आलेले असून, संबंधित लाभार्थ्यांनी विहीत कालावधीत आधारकार्डसह नमुद ठिकाणी कार्यालयीन वेळेत उपस्थित राहावे असे आवाहन समाजकल्याणचे सहाय्यक आयुक्त, श्रीम. सुलोचना सोनवणे यांनी केले आहे.

# 'वेव्हज परिषद-२०२५' निमित्त 'दिलखुलास' कार्यक्रमात सचिव डॉ. अन्बळगन पी. यांची मुलाखत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'दिलखुलास' कार्यक्रमात 'ऑडिओ व्हिज्युअल अँड एंटरटेनमेंट समिट' वेव्हज-२०२५ परिषदेनिमित्त उद्योग विभागाचे सचिव डॉ. अन्बळगन पी. यांच्या विशेष मुलाखतीचे प्रसारण होणार आहे.

'दिलखुलास' कार्यक्रमात ही मुलाखत गुरूवार दि. २४ आणि शुक्रवार दि. २५ शनिवार दि. २६ आणि सोमवार दि. २८ एप्रिल २०२५ रोजी आकाशवाणीच्या सर्व केंद्रावरून व 'न्यूज ऑन एआयआर'या मोबाईल ॲपवर सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत प्रसारित होणार आहे.

'ऑडिओ व्हिज्युअल अँड एंटरटेनमेंट समिट' म्हणजेच वेव्हज- २०२५ परिषदेचे १ ते ४ मे २०२५ या कालावधीत जिओ कन्व्हेशन सेंटर, बीकेसी, मुंबई येथे आयोजन करण्यात आले आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून आपला देश क्रिएटिव्ह इकॉनॉमीमध्ये आघाडी घेत असून याचे प्रतिनिधित्व करण्याची जबाबदारी आपल्या राज्यावर सोपविण्यात आली आहे. या परिषदेच्या माध्यमातून भारताच्या सर्जनशील शक्तीला, जागतिक गुंतवणुकीला आणि धोरणात्मक बदलांना चालना देणासाठी मोठी संधी उपलब्ध होणार आहे. त्याअनुषंगाने या परिषदेचे नियोजन त्यामध्ये होणारे कार्यक्रम आणि तयारीबाबत उद्योग विभागाचे सचिव डॉ. अन्बळगन पी. यांनी 'दिलखुलास' कार्यक्रमात माहिती दिली आहे.

# कोकणातील माकडे व वानरांच्या निर्बीजीकरणासाठी केंद्र उभारण्याचा प्रस्ताव विचाराधीन : वन मंत्री गणेश नाईक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : कोकणातील फळबागा आणि शेतीपिकांना वानर आणि माकडांच्या मोठ्या प्रमाणात होणाऱ्या उपद्रवाला आळा घालण्यासाठी माकडांचे निर्बीजीकरण करण्यासाठी केंद्र उभारण्याचा प्रस्ताव विचाराधीन असल्याचे वन मंत्री गणेश नाईक यांनी सांगितले.

रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातील शेतकऱ्यांना वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या त्रासासंदर्भात वन मंत्री श्री. नाईक यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. त्यावेळी श्री. नाईक बोलत होत. यावेळी वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, उपसचिव विवेक होसिंग, कोल्हापूरचे मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) आर.एम. रामानुजम, विभागीय वन अधिकारी गिरीजा देसाई, शिष्टमंडळातील दापोली ग्रामोद्योग फार्मर्स प्रोड्युसर कंपनीचे संचालक विनायक महाजन, पत्रकार मिलिंद लिमये, वन्य जीव अभ्यासक संतोष महाजन आदी यावेळी उपस्थित होते. तर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) शोमिता बिश्वास, अतिरिक्त प्रधान मुख्य वन संरक्षक नरेश झुरमुरे हे दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.



दापोली तालुक्यात रानडुकर, माकड व वानरांमुळे मोठ्या प्रमाणात शेतीचे नुकसान होत असून आता माकडे व वानरेही गावात येऊन घरातील वस्तूंचेही नुकसान करत असल्याचै श्री. महाजन यांनी सांगितले.

कोकणात माकडे व वानरांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. वन्य प्राण्यांपासून शेतीचे होणारे नुकसान झाल्यानंतर भरपाई देणे हा कायमस्वरुपी उपाय होऊ शकत नाही. हे नुकसान टाळण्यासाठी दीर्घकालीन प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी माकडे व वानरे यांचे निर्बीजीकरण करण्यासंदर्भात रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात निर्बीजीकरण केंद्र उभारण्याच्या प्रस्तावावर विचार सुरू आहे. वन्यप्राण्यांपासून फळबाग व शेतीचे होणारे नुकसान टाळण्यासाठी दीर्घकालीन उपाय योजना करण्यासाठी निधीची कोणतीही कमतरता भासू देणार नसल्याचे वनमंत्री श्री. नाईक यांनी यावेळी सांगितले.

रानडुकरांमुळे फळबागा तसेच भातशेतीचे नुकसान होते. त्यांचा रोखण्यासाठी शेतकऱ्यांना कायद्याच्या चौकटीत राहून अनुमती देण्यात यावी. तसेच शेतात येणाऱ्या वन्य प्राण्यांपासून बचावासाठी यापूर्वी कोकणातील शेतकऱ्यांना शस्त्र परवाने देण्यात आले होते. मात्र, हे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. अशा शेतकऱ्यांना शेतीच्या रक्षणासाठी नियमानुसार परवाने देण्याचे निर्देशही वन मंत्री श्री. नाईक यांनी यावेळी रत्नागिरीच्या जिल्हाधिकाऱ्यांना दिले.

यावेळी श्री. महाजन यांनी वन्य प्राण्यांमुळे होणाऱ्या पिक नुकसानीची भरपाई लवकर देण्यात यावी. तसेच सार्ळद्र प्राण्यामुळे होणाऱ्या नुकसानाचाही समावेश यामध्ये करण्याची मागणी केली.

**अधिकाऱ्यांना केल्या विविध सूचना**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश**

# धर्मादाय रूग्णालयांच्या संनियंत्रणासाठी राज्यस्तरीय विशेष तपासणी पथक स्थापावे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : काही रूग्णालयात अनामत रक्कम घेतल्याशिवाय उपचार केले जात नसल्याच्या तक्रारींच्या बाबींची गंभीर दखल राज्य शासनाने घेतली आहे. धर्मादाय रुग्णालयांच्या नियंत्रणासाठी धर्मादाय आयुक्त, आरोग्य विभाग आणि मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष यांच्या समन्वयातून विशेष तपासणी पथक तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. राज्यातील धर्मादाय रूग्णालयांकडून निर्धन व दुर्बल घटकातील रूग्णांवर उपचार मोफत व्हावेत. रूग्णालयांनी शिल्लक खाटा, निर्धन रूग्ण निधींची माहिती (आयपीएफ) ऑनलाईन प्रणालीत नोंद करावी, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष आणि धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या आढावा बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, मुख्य सचिव सुजाता सौनिक, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, मदत व पुनर्वसन विभागाच्या अपर मुख्य सचिव सोनिया सेठी, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, मुख्यमंत्र्याच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, विधी व न्याय विभागाच्या प्रधान सचिव सुवर्णा केवले, मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी, धर्मादाय आयुक्त अमोघ कलोती, मुख्यमंत्री सहायता मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, धर्मादाय विश्वस्त नियमानुसार धर्मादाय रूग्णालयात १० टक्के खाटा निर्धन घटक तर १० टक्के खाटा दुर्बल घटकातील रूग्णांसाठी आरक्षित ठेवणे बंधनकारक आहे. आपत्कालीन परिस्थितीत रूग्ण स्थिर होईपर्यंत तातडीचे उपचार व वैद्यकीय सेवा पुरविणे आवश्यक आहे. यासाठी रूग्णालयांनी कोणतीही अनामत रक्कम घेवू नये. धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाने धर्मादाय योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी ऑनलाईन प्रणाली विकसित करावी. धर्मादाय रुग्णालयावर देखरेख ठेवण्यासाठी जिल्हास्तरीय समिती तयार करावी. शिवाय केंद्र आणि राज्य शासनाच्या आरोग्य विषयक योजनांच्या संलग्नीकरण आणि समन्वयासाठीही प्रयत्न करावेत. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी धर्मादाय आयुक्तांच्या अंतर्गत विभागनिहाय स्वतंत्र अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

**ऑनलाईन माहिती भरणे सक्तीचे**

धर्मादाय कार्यालयाकडे नोंदणी करणाऱ्या रूग्णालयांना रूग्णांना दिलेल्या उपचाराची माहिती, रूग्ण, शिल्लक खाटा यांची माहिती ऑनलाईन प्रणालीत भरणे सक्तीचे करावे. महापालिका क्षेत्रात जागा आणि इतर सवलती घेणाऱ्या आणि महसूल विभागाकडून जमीन सवलत घेणाऱ्या रुग्णालयाची यादी तयार करावी. याबाबत समन्वय करण्यासाठी क्लस्टर तयार करून समिती प्रमुख नेमून माहिती न भरणाऱ्या रुग्णालयावर कारवाई करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

**रूग्णालयात डॅशबोर्ड आणि फलक**

राज्यातील प्रत्येक धर्मादाय रुग्णालयात रूग्णांसाठीच्या योजना, आजार, उपचाराबाबतच्या माहितीचे मोठ्या अक्षरातील फलक लावावेत. या फलकामुळे रूग्णांच्या नातेवाईकांना रिक्त खाटांची स्थिती, रूग्णालयात कार्यरत शासकीय योजना आणि इतर माहिती मिळण्यास मदत होईल. सर्व माहिती सर्वांना उपलब्ध होण्यासाठी ऑनलाईन प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यात यावी. शिवाय डॅशबोर्डवर माहिती दिल्यास रूग्णांना मदत होईल. याचे नियमित अद्ययावतीकरण होण्यासाठी वेगळी यंत्रणा तयार करावी, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.


**आतापर्यंत ७ हजार ३७१ रूग्णांवर उपचार**

धर्मादाय रूग्णालय कक्षाची स्थापना २०२३ मध्ये झाली असून आतापर्यंत १० हजार ७३८ ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले. यामध्ये ७ हजार ३७१ रूग्णांवर उपचार झाले असून २४ कोटी ५३ लाख रूपयांचा निधी खर्च झाल्याची माहिती मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सादरीकरणात दिली.

# दोन दुचाकीची समोरासमोर धडक ; एकजण जखमी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : आसरा ब्रिज येथे दोन दुचाकीची समोरासमोर धडक होऊन एक जण




गंभीर जखमी झाला. हीघटना शनिवारी घडली.याप्रकरणी शंकर वसंत जोकारे (रा.मु.पो. कंदलगाव,ता.दक्षिण सोलापूर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून प्रदीप सिद्धाराम माळी (वय-२१-,रा.मु.पो.आहेरवाडी, ता.दक्षिण सोलापूर)याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

यात अधिक माहिती अशी की,यातील फिर्यादीचा भाऊ दत्तात्रय जोकारे हे दुचाकी (क्रमांक एम एच १३ बी एफ ६०४४) वरून आसरा ब्रिज येथे आले. यावेळी संशयित आरोपीने त्याच्या ताब्यातील दुचाकी (क्रमांक १३ ई आर ६७८९) ही भरधाव वेगाने हायगयीने चालवून फिर्यादीचा भाऊ दत्तात्रय जोकारे यास धडक दिली.यात त्याच्या डोक्यास गंभीर दुखापत होण्यास कारणीभूत ठरल्याचे फिर्यादीत नमूद आहे.